आजचा शुभ विचार

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-66 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Monday 14 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६६ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ सोमवार, दि. १४ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## शुभांशू शुक्ला 15 जुलै रोजी पृथ्वीवर परतणार

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

------------------------

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर उतरणारे पहिले आणि अंतराळात प्रवास करणारे दुसरे भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांची मोहीम अंतिम टप्प्यात आहे. अंतराळवीर आयएएफ ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला १४ जुलै २०२५ रोजी ॲक्सिओम मिशन ४ मधील क्रू सहकाऱ्यांसह पृथ्वीच्या दिशेने परतीचा प्रवास सुरू करतील. त्यांचे यान मंगळवार १५ जुलै २०२५ रोजी पृथ्वीवर उतरणार आहे. भारतीय वेळेनुसार १५ जुलै रोजी दुपारी तीन वाजता यान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरात उतरणार आहे. यानातून अंतराळवीर २२ तासांचा प्रवास करुन पृथ्वीवर परतणार आहेत. पृथ्वीवर परतताच अंतराळवीरांची १८ दिवसांची मोहीम पूर्ण होणार आहे. ॲक्स -४ या यानाच्या क्रूमध्ये कमांडर पेगी व्हिट्सन, भारतीय अंतराळ



संशोधन संस्थेचे (इस्रो) पायलट शुभांशू शुक्ला , युरोपियन अंतराळ संस्थेचे (ईएसए) प्रकल्प अंतराळवीर पोलंडचे स्लावोस "सुवे" उझनान्स्की-विस्निव्स्की आणि हनर (हंगेरियन टू ऑर्बिट) अंतराळवीर टिबोर कापू यांचा समावेश आहे. या पथकाने विशिष्ट कक्षेत फिरणाऱ्या प्रयोगशाळेत साठ पेक्षा जास्त वैज्ञानिक प्रयोग केले. यापैकी सात प्रयोग हे इस्त्रोने तयार केलेले होते. यात मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये मेथी आणि मूग यांचे स्प्राऊटिंग, पाण्यातील सूक्ष्म जीवांचे Regeneration आणि स्नायूंच्या नुकसानावरील संशोधनाचा समावेश आहे. याशिवाय, कर्करोग संशोधन, डीएनए दुरुस्ती आणि अंतराळातील मानसिक तणाव यांचाही अभ्यास केला. हे प्रयोग भविष्यातील गगनयान मोहिमेसाठी अतिशय महत्त्वाचे ठरणार आहेत. ही मोहीम भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी मैलाचा दगड आहे. शुभांशू यांचा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील अनुभव हा २०२७च्या गगनयान मोहिमेला उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरणार आहे. भारताने पाचशे कोटी रुपये खर्चून ही संधी मिळवली, ज्यामुळे २०३५ पर्यंत स्वतःचं अंतराळ स्थानक आणि २०४० पर्यंत चंद्रावर मानव पाठवण्याचे स्वप्न सत्यात उतरवणं शक्य होणार आहे. नियोजनानुसार यान सोमवार १४ जुलै २०२५ रोजी भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळे होईल. यानंतर यानाचा पृथ्वीच्या दिशेने परतीचा प्रवास सुरू होईल. यान मंगळवार १५ जुलै २०२५ रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी तीन वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरात उतरेल.

## उज्ज्वल निकम होणार राज्यसभा खासदार, राष्ट्रपतींकडून झाले त्यांचे नामनिर्देशन

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------

वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रश्न समजून घेण्यास मदत व्हावी या उद्देशाने राष्ट्रपतींकडून विविध क्षेत्रातील निवडक मान्यवरांना राज्यसभेवर नामनिर्देशित केले जाते. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ज्येष्ठ वकील उज्ज्वल देवराव निकम, केरळमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ सी. सदानंदन मस्ते, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि प्रख्यात इतिहासकार आणि शिक्षणतज्ज्ञ मीनाक्षी जैन यांना राज्यसभेसाठी नामनिर्देशित केले आहे. उज्ज्वल देवराव निकम हे प्रसिद्ध वकील आहेत. त्यांनी अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये सरकारचे प्रतिनिधित्व केले आहे. मुंबईत झालेल्या १९९३ च्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात सरकारी वकील म्हणून त्यांनी काम केले होते. तसेच त्यांनी दहशतवादी अजमल कसाबविरुद्ध सरकारी





भारत का राजपत्र
The Gazette of India

असाधारण
EXTRAORDINARY
PART II—Section 3—Sub-section (ii)
PUBLISHED BY AUTHORITY

नई दिल्ली, 12 जुलाई, 2025

वकील म्हणून सरकारची बाजू मांडली होती. काही महिन्यांपूर्वी उज्ज्वल निकम यांनी लोकसभेची निवडणूक लढवली होती. उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघातून ते भाजपाच्या तिकिटावर निवडणूक रिंगणात उतरले होते. त्यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात उतरलेल्या कॉंग्रेसच्या वर्षा गायकवाड यांचा विजय झाला होता. निवडणुकीतील पराभवानंतर उज्ज्वल निकम राजकारणातून संन्यास घेणार का असा प्रश्न विचारला जात होता. या पार्श्वभूमीवर उज्ज्वल निकम राज्यसभेसाठी नामनिर्देशित झाले आहेत.

उज्ज्वल निकम यांचा जन्म जळगाव येथे झाला. त्यांचे वडील देवराव माधवराव निकम हे देखील बॅरिस्टर होते. त्यांनी विज्ञान विषयात बॅचलर पदवी प्राप्त केली आणि नंतर जळगाव येथील एस.एस. मणियार लॉ कॉलेजमधून कायद्याचे शिक्षण घेतले. उज्ज्वल निकम यांनी टी-सीरीजचे संस्थापक गुलशन कुमार यांची हत्या, भाजप नेते प्रमोद महाजन यांची हत्या आणि मुंबई सामूहिक बलात्कार यासारख्या अनेक हायप्रोफाइल खटल्यांमध्ये सरकारी वकील म्हणून तपास संस्थेची बाजू मांडली होती.

## युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांत नाशिक जिल्ह्यातील 'साल्हेर' किल्ला

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------



शिवशाहीत मराठा सैन्याने मुघलांविरुद्ध खुल्या मैदानात जिंकलेल्या पहिल्या लढाईचा साक्षीदार राहिलेल्या 'साल्हेर'चा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात समावेश झाल्यानंतर पुरातत्व विभागाने आता या किल्ल्याच्या राखीव क्षेत्रातील (बफर झोन) मुल्हेर, मोरागड, हरगड, न्हावीगड, भिलाई हे पाच किल्ले आणि मांगीतुंगी संरक्षित करून या स्थळांचे जतन, संवर्धन करण्याचे निश्चित केले आहे. राज्यात सर्वाधिक ६८ किल्ले नाशिक जिल्ह्यात आहेत. यामध्ये भुईकोटपेक्षा अधिक दुर्गगड आहेत. त्यांनाही आता महत्व प्राप्त झाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बागलाण मोहिमेत साल्हेर किल्ला स्वराज्यात दाखल झाला होता. मराठा सैन्याने मुघलांविरुद्ध खुल्या मैदानात जिंकलेली पहिली लढाई म्हणून 'साल्हेरची लढाई' प्रसिद्ध आहे. बागलाण तालुक्यातील साल्हेरला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून मानांकन दिल्यामुळे या किल्ल्याचे जतन, संवर्धन आणि व्यवस्थापन आदींची जबाबदारी वाढली आहे. डोलाबारी डोंगर रांगेत समुद्रसपाटीपासून ५१४१ फूट उंचीवर हा किल्ला आहे. त्याचे संपूर्ण व्यवस्थापन आता प्रशासनाकडे येईल. किल्ला परिसरात बांधकाम आणि विकास कामांवर निर्बंध येतील. महावारसा समितीने १० वर्षांच्या कालावधीसाठी तयार केलेल्या आराखड्यानुसार कार्यवाही होणार आहे.

दुर्ग संपदेला जागतिक ओळख मिळाल्याने पर्यटनास चालना मिळणार आहे. बागलाण तालुक्यातील साल्हेर किल्ल्याकडे जाणाऱ्या मार्गांचा विकास केला जाईल. किल्ला परिसरात प्राथमिक विकास, रचना कशा असाव्यात, यावर काम होईल. जिल्हा परिषद वा अन्य यंत्रणांना या क्षेत्रात परस्पर कुठलीही विकास कामे करता येणार नाहीत. किल्ल्यावर माहिती केंद्राची निर्मिती, माहिती व दिशादर्शक फलक लावले जातील. प्लास्टिक बंदीची कठोरपणे अंमलबजावणी होईल. काही धोक्याची ठिकाणे असल्यास पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तिथे काळजी घेतली जाईल. किल्ल्यावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणार आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज वितरणाची व्यवस्था केली जाईल. निर्बंध क्षेत्राबाहेर जगभरातून येणाऱ्या पर्यटकांसाठी पंचतारांकित हॉटेलऐवजी स्थानिक निवास व्यवस्था आणि ग्रामीण खाद्य संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे नियोजन आहे. याबाबतची माहिती राज्य पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे यांनी दिली. दुर्गम साल्हेरचे महत्व आसपासच्या पाठबळ देणाऱ्या किल्ल्यांमुळे वाढले. मराठ्यांच्या इतिहासात त्यांचे वेगळे महत्व आहे. पर्यटक साल्हेरबरोबर सभोवतालच्या किल्ल्यांनाही भेटी देतील. साल्हेरच्या राखीव क्षेत्रात मुल्हेर, मोरागड, हरगड, न्हावीगड, भिलाई या किल्ल्यांसह जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र मांगीतुंगीचाही समावेश होतो. त्यांचे जतन व संवर्धन करण्यात येणार आहे. मुल्हेर हा आधीपासून राज्य संरक्षित आहे. राखीव क्षेत्रातील अन्य चार किल्लेही त्या यादीत समाविष्ट होतील. राज्यात सर्वाधिक ६८ किल्ले एकट्या नाशिक जिल्ह्यात आहेत. यामध्ये भुईकोटपेक्षा दुर्ग किल्ल्यांची संख्या मोठी आहे. साल्हेरच्या राखीव क्षेत्रातील किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याचे पुरातत्व विभागाचे नियोजन असल्याचे सहायक संचालक अमोल गोटे यांनी नमूद केले.


महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार



कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449



अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# जनसुरक्षा विधेयक

विधिमंडळाच्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधानसभेत जनसुरक्षा विधेयक सादर केले. अर्थात हे सुधारित विधेयक सभागृहात येणार याची विरोधकांनाही कल्पना होती. हे विधेयक सादर केल्यानंतर सत्ताधारी व विरोधकांकडून यावर बराच वेळ विधानसभेत चर्चा झाली. महायुतीकडे सभागृहात स्पष्ट बहुमत असल्याने चर्चेनंतर हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आले. यानंतर हे विधेयक आता विधान परिषदेत सादर करण्यात येईल.

विधान परिषदेत याला मंजुरी मिळाल्यानंतर ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवण्यात येईल. राज्यपालांनी यावर स्वाक्षरी केल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल. महाराष्ट्रातील नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आणण्याचा निर्धार महायुती सरकारने केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीदेखील मार्च २०२६ पर्यंत भारतातून नक्षलवाद संपुष्टात आणणार असल्याची घोषणा केली आहे. केंद्र सरकारकडून तसे प्रयत्नही सुरू झाले आहेत. महाराष्ट्रातही मोदी-शहा यांच्या निर्देशानुसारच वाटचाल करणारे महायुतीचे सरकार सत्तेवर आहे. त्यामुळे अमित शहा यांच्या घोषणापूर्तीसाठी महाराष्ट्र कोठेही कमी पडू नये यासाठीच महायुती सरकारकडून प्रयत्न सुरू झाले आहेत. जनसुरक्षा विधेयक हा त्याचाच एक भाग असल्याचे सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्रात पूर्वी चार जिल्ह्यांपुरताच माओवादाने प्रभावित झालेल्या नक्षलवादी चळवळीचा उपद्रव दिसत होता. पण मागील काही काळापासून राज्य सरकारने शेजारील राज्यांच्या मदतीने केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली नक्षलवादविरोधी अभियान सुरू केल्याने महाराष्ट्रात माओवादी चळवळीचा प्रभाव कमी होत चालला आहे. आता राज्यात केवळ दोन जिल्ह्यांमध्ये नक्षलवाद्यांच्या हालचाली व कारवाया सीमित राहिल्या आहेत; परंतु या दोन जिल्ह्यांतूनच नाही, तर राज्यातूनच माओवाद संपुष्टात आणण्यासाठी महायुती सरकारने आक्रमक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. माओवादी संबंधित संघटना वरवर पाहता लोकहिताचा आव आणत लोकशाही वाचविण्यासाठी आपण कार्यरत असल्याचा दावा करत असतात. प्रत्यक्षात त्यांचे कार्य व वाटचाल ही कायदा व सुव्यवस्थेला आवाहन निर्माण करणारी असल्याचे अनेक घटनांमध्ये स्पष्ट झालेले आहे.

या संघटना भारतीय संविधानाला व लोकशाहीलाही मानत नसल्याचे उघड झाले आहे. आपली भूमिका राबविण्यासाठी चुकीचा प्रचार करून हिंसेला खतपाणी घालण्याचे कार्य गेल्या काही वर्षांमध्ये या संस्थांकडून करण्यात येत आहे. विधानसभेत सरकारने मांडलेले जनसुरक्षा विधेयक मंजूर झाले असले तरी सरकारने विधेयकात विरोधकांच्या सूचनांचाही आदर करत काही ठिकाणी लवचिक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. सामाजिक संघटनांनी सुरुवातीपासूनच जनसुरक्षा विधेयकातील कठोर तरतुदींना विरोध दर्शवला होता. या कायद्यानुसारचे सर्व गुन्हे दखलपात्र असून अजामीनपात्र आहेत. संघटनांच्या मालमत्तेचा शासनाने ताबा घेतल्यास संबंधित अधिकाऱ्याच्या विरोधात दिवाणी किंवा फौजदारी दावा करता येणार नाही.

संघटनेचा एकही सदस्य बेकायदेशीर कृत्य करत असल्यास तोपर्यंत संघटना अस्तित्वात असल्याचे मानले जाणार आहे. या कायद्याच्या कार्यवाहीस कोणत्याही न्यायालयास मनाई हुकूम देता येणार नाही. तसेच जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय अधिसूचित जागेत प्रवेश केल्यास तो फौजदारी प्रवेश मानला जाणार होता. मात्र, यातील काही तरतुदींमध्ये आता बदल करण्यात आला आहे. जनसुरक्षा विधेयकातील काही कठोर तरतुदींमध्ये बदल करण्यात आला असून, हे विधेयक सौम्य करण्यात आले आहे. मूळ विधेयकात व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध अशी तरतूद होती, याऐवजी कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना, असा बदल करण्यात आला आहे. यामुळे सरकारला सरसकट कोणाच्याही विरोधात अटकेची कारवाई करता येणार नाही. सरकारच्या या भूमिकेचे आता राज्यातील सामाजिक संस्था आणि संघटनांनीदेखील स्वागत केले आहे.

जनसुरक्षा विधेयकामुळे माओवादाशी संबंधिताची दुकानदारी बंद होऊन त्यांच्या हालचालींना टाळे लागणार असल्याने विधेयकाबाबत अपप्रचारच जनसामान्यांमध्ये पसरविण्याचे काम संबंधितांकडून सुरू झाले होते. हे विधेयक आल्यावर डाव्या संघटना आणि डाव्या संघटनांशी संबंधित लोकांना अटक केली जाईल, त्यांच्यावर दडपशाही आणि बळाचा वापर केला जाईल, अशी भीती विविध संघटना आणि विरोधकांनी व्यक्त केली होती. तसे समाजव्यवस्थेमध्ये पसरविण्याचे कामही सुरू झाले होते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असे काही होणार नसल्याची ग्वाही विधानसभेत दिल्याने विरोधकांच्या अपप्रचारातील हवाच निघून गेली आहे. हा कायदा कुणाला त्रास देण्यासाठी नाही, तर जे लोक आपल्याच देशातील लोकांना ब्रेनवॉश करून चिथावणी देत आहेत. त्यांच्यावर आळा घालण्यासाठी मांडण्यात आला आहे. संसदीय लोकशाहीच्या मार्गाने चालणाऱ्या भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पक्षांचा आणि त्यातील नेत्यांचा आम्हाला आदरच आहे, असे सांगत फडणवीसांनी विधेयक मांडण्यामागील राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. फडणवीसांनी सभागृहात या विधेयकाबाबत डाव्यांच्या मनामध्ये असलेले गैरसमज हटविण्याचे काम केले आहे.

या कायद्याबद्दल एक गैरसमज आहे की, जर डाव्या संघटनांचे आंदोलन झाले, डाव्या विद्यार्थी संघटनांचे आंदोलन झाले, तर हा कायदा लागू होईल. सर्वांना लोकशाही मार्गाने विरोध करण्याचा अधिकार आहे व जर या आंदोलनावेळी हिंसा झाली, तर अशा वेळी हा कायदा लागू होणार नसल्याचेही त्यांनी राज्य सरकारच्यावतीने स्पष्ट केले आहे. जनसुरक्षा विधेयकामुळे राज्यातील माओवाद कायमचा संपुष्टात येणार असल्याचा दावा केला जात आहे. जनसुरक्षा विधेयकाचे जनसामान्यांकडून स्वागत करण्यात आले असून राज्य सरकारकडूनही विधेयक सर्वसामान्यांच्या सुरक्षेसाठीच असल्याचा दावा केला जात आहे. महाविकास आघाडीकडून या विधेयकाला विरोध करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असल्या तरी सभागृहातील संख्याबळामुळे विधान परिषदेतही जनसुरक्षा विधेयक मंजूर होण्यास फारसे अडथळे येतील, असे दिसत नाही.

# कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करावे आणि राजकीय पुढाऱ्यांनी ऐश आराम करावे हा कुठला न्याय?

शेतकरी हा राबराब राबतो व मेहनत करतो उन, पाऊस, वादळ, सुनामी, अवकाळी पाऊस यांच्याशी संघर्ष करतो तेव्हा त्यांच्या शेतातून धान्य पिकते व उत्पादन होते.अशाप्रकारे अनेक संघर्ष दरवर्षी करीत असतो व जनतेच्या पोटाची खळगी भरण्याचे काम करतो.परंतु आलेल्या पिकाला योग्य भाव मिळेल की नाही याचीही त्याला चिंता असते.कारण पहिलेच तो कर्जामध्ये डुबलेला असतो व परिवार चालविण्यास अडचण निर्माण होते अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्या करतांना दिसतात.आज शेतकऱ्यांच्या शेतीची किंमत लावली तर करोडोंची असुन सुद्धा तो गरीबीत वावरतो आणि राजकीय पुढारी मात्र पाच वर्षांत आपोआप करोडपती होतात त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या खऱ्या वेदना राजकीय पुढारी समजूच शकत नाही.कारण राजकीय पुढाऱ्यांवर कधी आत्महत्येची पाळीच येत नाही.शेतकरी वर्ग आत्महत्या करणार नाही अशा योजना सरकारने अमलात आणायला पाहिजे.शेतकरी कष्ट करतो तरी पैशांनी शुन्य! राजकीय पुढारी समाजसेवा करतात म्हटले जाते,मग हे कसे काय करोडपती होतात? असाही प्रश्न उपस्थित होतो!आज राज्यासह देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बीकट आहे.कारण आज कोणाजवळ, बैलबंडी नाही तर कोणाजवळ शेती करण्यास पैसा नाही असेही अनेक शेतकरी राज्यासह देशात दिसून येतात.शेतकरी शेतीने व मनाने कितीही मोठा असला तरी मात्र पैशांनी अत्यंत कमकुवत आणि गरीब आहे. त्यामुळेच आज शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतांना दिसतात हे कृषिप्रधान देशाचे व स्वतंत्र भारताचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.या उलक आपण विचार केला तर देशासह राज्यातील आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ मोठ्या प्रमाणात शेती व चल-अचल संपत्ती दिसून येते व आज करोडपती आहेत याला कोणते व कसले समाजसेवक म्हणावे!ही बाब देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला अजून पर्यंत समजलीच नाही. आज आमदार-खासदार-मंत्री करोडोंचे घोटाळे करतात व यांना सरकार आणि न्यायपालिकेकडुन क्लिनचीट मिळते व राज्याचे मंत्री म्हणून पुन्हा विराजमान होतात हे कोणते समाज सेवक म्हणावे!आज राजकीय पुढारी सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यात धूळफेक करीत आहे व मेहनत न करता करोडोंची चल-अचल संपत्ती जमा करीत आहे हे लोक एवढी संपत्ती जमा करून ठेवतात की सात पिढ्या बसुन खावु शकेल.परंतु शेतकरी राबराब राबतो दिवसरात्र काबाडकष्ट करून १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरतो अशा अन्न दात्यावर आज आत्महत्येची पाळी येते ही किती लाजीरवाणी गोष्ट म्हणावी! म्हणजे आज शेतकरी उपाशी आणि राजकीय पुढारी तुपाशी असल्याचे स्पष्ट दिसून येते.आज भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही कृषिप्रधान देशातील शेतकरी गरीबीच्या खाईत गुदमरत आहे आणि जेव्हा गरीबी आपली सिमा रेषा ओलांडते तेव्हाच शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते. महाराष्ट्रासह देशातील कोणत्याही राज्य सरकारांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत ठोस असे कोणतेही पाऊल उचलले नाही जर उचलले असते तर शेतकऱ्यांवर आत्महत्ये वेळ कदापि आलीच नसती.परंतु आपल्या देशात उलट आहे जे मेहनत आणि काबाडकष्ट करतात तो शेतकरी दिवसेंदिवस गरीबीच्या खाईत दबत आहे व राजकीय पुढारी दिवसेंदिवस अती श्रीमंत होतांना दिसत आहे.आज राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा आहे की देशाला तब्बल दहा वर्षे कोणाही जवळुन कर्ज घेण्याची गरज नाही.राजकीय पुढारी समाज सेवा करतात असे म्हटल्या जाते मग समाजसेवा करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा येतो कोठून यांच्यावर आत्महत्येची पाळी का येत नाही? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढाऱ्यांना अमाप पगार वाममार्गाने पैसा कमविण्याची योग्य सुविधा या सर्वांच उपलब्ध असतात.त्यामुळे यांचे पाप शेतकऱ्यांना भोगावे लागते व आत्महत्येची वेळ येते ही अत्यंत गंभीर बाब आहे यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.आज नंदुरबार जिल्ह्या सारखे अनेक जिल्हे राज्यात आहेत की त्या ठिकाणी सरकारकडून मुलभूत सुविधा अजून पर्यंत उपलब्ध नाहीत. तरीही सरकार फक्त घोषणांचा पाऊस पाडतात व बघ्याची भूमिका घेतांना दिसतात.असे अनेक जीवंत उदाहरण आपण सर्वांनीच पाहिले.राज्यात किंवा देशात कोणतीही सरकार असो ते सर्व एकाच माळेचे मणी असतात.कारण आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विचार केला तर २००४ ते २०१३ या १० वर्षात ३६८४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर २०१४ ते २०२४ या ११ वर्षाच्या कालावधीत ४०९८२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या यावरून आपण समजू शकतो की शेतकऱ्यांची किती भयावह स्थिती आहे.कारण शेतकऱ्यांच्या गंभीर व बिकट परिस्थितीमुळे त्यांच्या आत्महत्या थांबता-थांबेना! परंतू राजकीय पुढारी मात्र समाजसेवेच्या नावावर मस्त मजा करतांना दिसतात त्यामुळे यांच्यावर आत्महत्येची पाळी येतच नाही.कारण हे सर्वच शेतकऱ्यांचे रक्त पितांना दिसतात.ज्याप्रमाणे देशात व राज्यात राजकीय पुढाऱ्यांचे कमाईचे साधन आहे तसे साधण शेतकऱ्यांजवळ नसल्याने त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येते.त्यामुळे हे मायबाप सरकार राजकीय पुढारी कधीच आत्महत्या करीत नाही त्याचप्रमाणे शेतकरी सुध्दा आत्महत्या करणार नाही अशी काही तरी योजना सरकारने ताबडतोब अंमलात आणावी याचे राज्याच्या जनतेसह देशाची जनता स्वागतच करेल.शेतकरी हा मनाने एवढा श्रीमंत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही. परंतु पैशांने मात्र शुन्य आहे ही मोठी तफावत शेतकरी आणि राजकीय पुढारी यांच्यात दिसून येते.राजकीय पुढारी समाजसेवेच्या नावाखाली करोडो रुपये कमवितात व शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतात.यावर केंद्र सरकारने व राज्य सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार
नागपूर

# बोनसच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट! सालेकसातील धक्कादायक प्रकार उघड?
## "प्रथम २५% द्या, मगच बोनस!" — धान खरेदी सोसायट्यांचा खुला सौदा?
## तहसीलदारांकडे लेखी तक्रार, चौकशीला सुरुवात?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------

राज्य सरकारने धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रती हेक्टर २०,००० रुपयांचा बोनस जाहीर करताच सालेकसा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सरकारच्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करून धान विक्रीची प्रक्रिया पूर्ण केली. शेतकऱ्यांच्या खात्यावर बोनस जमा होण्यास सुरुवातही झाली. पण त्याचवेळी एका गंभीर गैरप्रकाराचा पर्दाफाश झाला आहे.

शेतकऱ्यांनी लावलेला आरोप धक्कादायक आहे—

धान खरेदी केंद्रावर ऑनलाईन रजिस्ट्रेशन वेरीफिकेशनसाठी थेट बोनसच्या २५ टक्के रक्कमेची मागणी होत असल्याचा गौप्यस्फोट शेतकऱ्यांनी केला आहे.



"अग्रिम २५% द्या, मगच तुमचे वेरीफिकेशन होईल," असा सरळ इशारा संबंधित सोसायट्यांकडून दिला जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

हा प्रकार शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत करणारा असून, सरकारी योजना म्हणजे भ्रष्टाचार आणि लाचखोरीचं दुसरं स्वरूप बनल्याची भावना ग्रामीण भागात उफाळून आली आहे.

शेतकऱ्यांची संतप्त प्रतिक्रिया —

बोनससारख्या थेट मदतीच्या योजनाही दलालांच्या जाळ्यात अडकत असतील, तर आम्ही सरकारकडून काय अपेक्षा ठेवायची? अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. यापूर्वीही अशाच प्रकारच्या लाचखोरीच्या घटनांमुळे लाभार्थींना त्रास सहन करावा लागला होता.

सध्या अनेक शेतकऱ्यांना रबी हंगामातील धान विक्रीचे पैसे मिळालेले नाहीत. अशा कठीण परिस्थितीत बोनस मिळवण्यासाठीही लाच द्यावी लागत असेल, तर शासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

तक्रार तहसीलदारांकडे — कारवाईचे संकेत

सालेकसा तालुक्यातील कहाली आणि परिसरातील शेतकऱ्यांनी तहसीलदार नरसय्या कोडागुरले यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. कोडागुरले यांनी तत्काळ चौकशी सुरू केली असून दोषींवर कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत.

तहसीलदार नरसय्या कोडागुरले यांची प्रतिक्रिया —

"सालेकसा तालुक्यात शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी अत्यंत गंभीर आहेत. वेरीफिकेशनसाठी २५ टक्के रक्कम मागितल्याचे निदर्शनास आले आहे. याप्रकरणी चौकशी सुरू असून, पुढील कारवाईसाठी आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पत्र पाठवले आहे. दोषी सापडल्यास कोणतीही गय केली जाणार नाही."

शेतकऱ्यांच्या हक्काची रक्कम 'कमीशन'च्या जाळ्यात! शासनाने तातडीने लक्ष घालावे, अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरतील!

# जागतिक लोकसंख्या दिनी पिंपळनेर महाविद्यालयात तरुणांच्या भूमिकेवर भर

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



११ जुलै २०२५ रोजी वाढत्या लोकसंख्येमुळे पाणी जमीन आणि खनिजे यासारख्या नैसर्गिक संसाधनावर प्रचंड ताण येत आहे. जास्त लोकसंख्येमुळे प्रदूषण वाढते आणि त्याचे सर्वच सजीवावर दुष्परिणाम होतात. याच पार्श्वभूमीवर जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त पिंपळनेर येथील कर्मवीर आ .मा .पाटील कला , वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन .के .पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग , आयक्यूएसी विभाग आणि अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमानाने एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . लोकसंख्या वाढीचा वेग रोखण्यासाठी समाजात याविषयी प्रचार आणि प्रसार करण्याच्या दृष्टीने तरुणाची भूमिका महत्त्वाचे असल्याचे मत प्राचार्य डॉ .लहू पवार यांनी याप्रसंगी व्यक्त केले . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार डॉ.लहू पवार होते . त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात सांगितले की, लोकसंख्येच्या बाबतीत आपला भारत देश एक अब्ज चैरेचाळीस कोटी या आकड्यासंह जगात पहिल्या क्रमांकावर आहे , तर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यांनी लोकसंख्या वाढीचे फायदे आणि तोटे यावर ही प्रकाशटाकला.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राचार्य एल.जे. गवळी , सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉक्टर संजय तोरवणे, डॉ. नितीन सोनवणे, आय क्यू सी समन्वयक डॉ .एस.पी. खोडके आदी उपस्थित होते . महाविद्यालयाचे प्रा .डॉ.सतीश मस्के, डॉ. आनंद खरात, प्रा .एम .व्ही बळसाने, डॉ. योगेश्वर नांद्रे, प्रा. सी .एन .घरटे , डॉ. कृष्णा वसावे ,प्रा.डी .बी.जाधव , प्रा.प्रथम सूर्यवंशी, प्रा. भूषण वाघ, प्रा.तुषार तोरवणे, शिक्षके -तर कर्मचारी , आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते .

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एल.जे. गवळी यांनी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय तोरवणे यांनी सूत्रसंचालन केले, तर आय क्यू एसी समन्वयक डॉ. एस पी खोडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नूतन मराठा विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुजनांचा सत्कार सन्मान

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

दि.१० जुलै २०२५ रोजी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आगळा वेगळा सन्मान करून गुरूपौर्णिमा साजरी केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य मा. रावसाहेब संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक मा. रघुनाथ नागरे, शिक्षक प्रतिनिधी श्री.हरकलाल पवार, शिक्षकेतर प्रतिनिधी श्री.सिद्धार्थ मोहिते भाऊसाहेब, ज्येष्ठ शिक्षक श्री.अशोक पाडवी,सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू आणि भगिनी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात केली.

विद्यालयाचे संगीत शिक्षक श्री.राकेश खैरनार यांनी "असो तुला देवा माझा सदा नमस्कार" ही प्रार्थना गायली. नंतर विद्यालयातील १० वी अ मधील विद्यार्थिनीं कु. चॉनी पाटील हिने दिनविशेष सादर केला. विद्यालयातील गुरुजनांचा इयत्ता ९ वी व १० वी अ इयत्तेतील विद्यार्थिनींनी लेखणी व पुष्प देऊन आदरपूर्वक सन्मान केला. तत्पूर्वी सर्व गुरुजनांचा परिचय कु.तेजल वेंडाईत व कु.रसिका साळुंखे यांनी करून दिला.





विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक श्री. के.के.गांगुर्डे सर यांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेनिमित्त मार्गदर्शन केले. तसेच विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील यांनी विद्यार्थ्यांना अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन करतांना असे म्हटले की,

आजच्या काळात प्रत्यक्ष शिक्षक जरी आपल्याजवळ नसेल तरीही एक गुरु मात्र सदा आपल्या सोबत असतो तो म्हणजे ग्रंथ या संदर्भात मला एक विलक्षण उदाहरण आठवते ब्राझीलमध्ये कैद्यांना शिक्षा कमी करण्यासाठी अनेक योजना आहेत त्यापैकी एक योजना म्हणजे वाचनाद्वारे शिक्षा कमी करण्याची योजना या योजनेनुसार जो कैदी पुस्तक वाचून त्यावर दहा दिवसाच्या आत अभिप्राय लिहिला तर त्याच्या शिक्षेमधून चार दिवस सूट मिळते अशा पद्धतीने एका वर्षात १२ पुस्तकं वाचली तर एकूण ४८ दिवस शिक्षा कमी होऊ शकते या उपक्रमाचा खरा उद्देश फक्त शिक्षा कमी करणं नाही

या योजनेमुळे कैद्यांमध्ये विचार करण्याची सवय लागते त्यांच्या आत मध्ये असलेला संवेदनशील माणूस हळहळू पुन्हा जागा झाला पाहिजे आज शिक्षक म्हणून मी एवढेच सांगू इच्छितो की...

शब्दांशी, ग्रंथांशी, विचारांशी मैत्री करा शिकणं कधीही थांबवू नका आजच्या दिवशी माझ्या सर्व विद्यार्थी विद्यार्थ्यांनींना सहकार्यांना हीच विनंती प्रत्येक गुरुपौर्णिमेला एखादा नवा ग्रंथ आपल्या जीवनात आणा. तेवढेच पुरेसं आहे एका उत्तम गुरूच्या भेटीसारखं निश्चित अनुभव येईल धन्यवाद कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. खुशी बेडसे यांनी केले.

# हातावर पोट भरणार्या छोट्या व्यावसायिकांना छळू नका ! धुळ्यात गुटखा आणणाऱ्या 'माफियांना' बेढ्या ठोका !!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------

शाळा आणि महाविद्यालयाच्या परिसरात लहान मोठ्या स्वरूपात गुटखा किंवा यांसारख्या तंबाकूजन्य नशेखोरी पदार्थांची बाजारपेठ पोलिसांनी लक्ष्य केली याचे स्वागतच, पण अशी व्यसनांना खत देणार्या पदार्थांची कंटेनरे जिल्ह्यात आणि धुळे शहरात येतातच कशी या सहज पडणार्या प्रश्नाची उत्तरे कदाचित यंत्रणाच देऊ शकेल. यामुळं जिल्हा पोलीस अधीक्षकांनी गुटख्याच्या होलसेल बाजारावरच हातोडा घालण्याची तयारी ठेवायला हवी. हातावर पोट भरणार्या छोट्या व्यावसायिकांना पोलिसांनी छळू नये, धुळ्यात गुटख्याच्या कंटेनर आणणार्या 'माफियांना' बेढ्या ठोकाव्यात अशी अपेक्षा सर्मसामान्य जनतेतून व्यक्त केली जात आहे.

बेरोजगारांसाठी 'सोयीचा धंदा'

धुळे जिल्हा हा आसपासच्या जिल्ह्याच्या तुलनेत अवघ्या चार तालुक्याचा तरीही या जिल्ह्यात राजकीय, आर्थिक, सामाजिक, व्यावसायिक, औद्योगिक आणि अन्य लहान मोठ्या क्षेत्रात प्रचंड महत्वाकांक्षा दिसते. यात मग अवैध व्यावसायिक कसे मागे राहतील.त्यांचेही कुटुंब आणि संसार आहे.सरकार पोसणार कुणाकुणाला? एकतर शिकल्यासावरलेल्या आणि प्रचंड शिक्षण घेऊनही काम (नोकरी) न मिळाल्याने समाजाच्या लेखी बेरोजगार ठरलेल्यांची संख्या वाढली आहे.सरकार नोकर्या उपलब्ध करून देत नाही आणि झटपट पैसे मिळतील असे उद्योग नाहीत.यामुळं सोपा मार्ग कोणता तर तो कुठलेही बेकायदेशीर व्यवसाय बिनधास्त करण्याचा तेवढा उरतो.अशा व्यवसायासाठी कुठे अर्ज करण्याची गरज नाही आणि लेखी परवानगीची गरज नाही. तेथे किंमत आणि खात्री असते ती केवळ आश्वासक शब्दाची. अपेक्षित आश्वासन यंत्रणेकडून मिळाले,की थेट कंटेनर भरून गुटखा आणला तरी कुणी फिरकण्याची हिम्मत करत नाही. यामुळेच हा सोयीचा मार्ग अलीकडे अनेकानेक युवकांनी निवडल्याचे दिसते. गुटखा किंवा गांजा ही तर जिल्ह्याची ओळखच. या दोन किंवा तीसर्या बनावट दारूचे सरेआम उत्पादन-विक्री या बेकायदेशीर धंद्याचे पिक बाराही महिने उगवत राहते. यास येथील भौगोलिक, नैसर्गिक स्थितीही पूरकच आहे. याचा फायदा उचलणार नाही तो उत्साही तरुण कसला. अशी तरुणांची एक ना अनेक तुकडी जिल्ह्यात तयार झाली आहेत.

दिखाऊ छापासत्रा पेक्षा मुळावर घाव घाला

गुटखा बंदी महाराष्ट्रात आहे,आजूबाजूच्या राज्यांमध्ये ती नाही. यामुळे महाराष्ट्र पार करून अन्य राज्यात गुटखा वाहून नेणार्या वाहनांवर पोलीस कारवाई करू शकत नाहीत. यापैकी काही वाहने अधिकचा गुटखा भरून आणत असतील आणि तो वाटेवरच्या धुळे जिल्ह्यातल्या कुठल्याशा गल्लीत सोडून जात असतील तर यावर पोलीसांची नजर पडतच नाही असे कुणालाही वाटणार नाही आणि पटणारही नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने शाळा परिसरातील गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आणि जिल्हा पोलिसांनी ती शहरासह जिल्ह्यात छापे घालून पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही घटना कौतुकाला पात्रच आहेत.पण एवढ्यावर मुळ प्रश्न सुटणार आहेका हा खरा प्रश्न आहे.पान टपरी किंवा काही चौरस फुटात थाटलेल्या दुकानामध्ये तपासणी केल्यावर पोलिसांच्या हाती गुटख्याच्या फारतर किती पुड्या हाती लागतील? अशा दिखाऊ छापासत्रा पेक्षा मुळावर घाव घालायला हवा. गुटख्याचे कंटेनर केंव्हा, कुठून येतात आणि ते कुठे रिकामे होतात याची माहिती पोलिसांना नसेल असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. पण हे सगळे माहिती असतांना खरे दरोडेखोर सोडून भुरट्या चोरांना पकडायचे आणि कारवाई केल्याचे रकाणे भरायचे यात कठोर कारवाई आणि धन्यता ती कसली.

कर्तव्यदक्ष पोलिस अधिक्षकांनी लक्ष द्यावे

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या प्रशासकीय कामकाजाची पद्धत न्यारीच आहे. आजवर येथे येऊन गेलेल्या पोलीस अधीक्षकांपेक्षा वेगळे काम त्यांनी केले आहे. यामुळे सराईत गुन्हेगारांवर वचक बसलाच पण नव्याने गुन्हेगारी विश्वात प्रवेश करू इच्छिणार्यांनाही कठोर कायद्याची जाणीव झाली. यामुळे संभाव्य गुन्हेगारी कमी होण्यास वाव मिळाला. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आता गुटखा आणणारे, त्याचा मोठ्ठा साठा करणारे आणि खुलेआम बाजारात विकणार्यांना लक्ष्य करायला हवे.गुटख्याची बाजारपेठ फुलविणार्यांना एकदा दणका बसला, की आपोआपच शाळा, महाविद्यालये भोवतालच्या पानटपर्या, दुकानामध्ये छापा घालण्याची तसदी घेण्याची गरज भासणार नाही. पोलिसांची हीच शक्ती इतर गुन्हे थोपविण्यासाठी कामात येईल.

# दुय्यम निबंधक कार्यालयात सुविधांचा अभाव : नागरिकांचे हाल, कामकाजावर परिणाम?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------

गोरेगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालयात सुविधांचा अभाव आणि कामकाजातील अनियमिततेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. कार्यालयीन अधिकाऱ्यांच्या दररोजच्या अप-डाऊनमुळे नोंदणी प्रक्रियेत सातत्याने अडथळे निर्माण होत असून, रजिस्ट्री कामांमध्ये विलंब होतो आहे. दरवर्षी सुमारे १५०० ते २००० रजिस्ट्री होणाऱ्या या कार्यालयात २०१९ पासून प्रिंटरसारखी मूलभूत सुविधा उपलब्ध नाही. परिणामी, रजिस्ट्रीसाठी आलेल्या नागरिकांना अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी येथील कार्यालयात जावे लागते. एका साध्या दस्तऐवजासाठी अनेक तास वाया जात आहेत. दररोज ८ ते १० रजिस्ट्री होत असताना, नागरिकांसाठी बसण्याची, पिण्याच्या पाण्याची वा स्वच्छतागृहाची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. त्यातच सर्व्हर डाऊन होण्याच्या समस्येमुळे दोन दिवसांपासून नोंदणी प्रक्रिया ठप्प झाली आहे.

विशेष म्हणजे, जिल्ह्यातील बहुतांश दुय्यम निबंधक कार्यालये तहसील कार्यालयांच्या परिसरात असून तेथे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध कामे उरकता येतात. मात्र, गोरेगावमधील निबंधक कार्यालय तहसील कार्यालयापासून दूर असल्याने स्टॅम्प पेपर खरेदीपासून नोंदणीपर्यंतचा प्रवास त्रासदायक ठरतो. येथे केवळ एक नोंदणी अधिकारी कार्यरत असून त्यांच्यासोबत दोन कंत्राटी कर्मचारी आहेत. अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत कामकाज ठप्प होते. त्यातच, शासकीय आदेशानुसार ठरावीक शुल्काशिवाय इतर कोणतेही शुल्क न आकारण्याचे स्पष्ट असले तरी नागरिकांकडून अतिरिक्त शुल्क घेतले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर नागरिकांनी कार्यालयातील मूलभूत सुविधा सुधारण्याची, कर्मचारी संख्या वाढवण्याची तसेच नियमित व सतत सेवा देण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# तामिळनाडूमध्ये मोठी दुर्घटना, मालवाहू रेल्वेला भीषण आग; परिसरात आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट, रेल्वे सेवा विस्कळीत

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

तामिळनाडूमधील तिरुवल्लूर या ठिकाणी एक मोठी दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. डिझेल वाहून नेणाऱ्या एका रेल्वेला भीषण आग लागल्याची घटना तिरुवल्लूर या ठिकाणी घडली आहे. ही रेल्वे चेन्नईवरून इंधन घेऊन जात होती. या घटनेमुळे त्या मार्गावरील रेल्वे सेवा विस्कळीत झाली आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून मतदकार्य सुरू आहे.



तामिळनाडूमधील तिरुवल्लूर या ठिकाणी चेन्नई बंदरातून इंधन घेऊन जात असलेल्या मालवाहू रेल्वेला रविवारी पहाटे अचानक भीषण आग लागली. या रेल्वेच्या चार डब्ब्यांना आग लागली, त्यानंतर त्या डब्ब्यांना उर्वरित रेल्वेपासून वेगळं करण्यात आलं. त्यानंतर तात्काळ स्थानिक प्रशासनाचे अधिकारी आणि अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. तसेच ही आग नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न अग्निशमन दलाचे जवान करत आहेत.

दरम्यान, ही मालवाहू रेल्वे रुळावरून घसरल्यानंतर आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पण अद्याप या आगीचं नेमकं कारण समोर आलं नसलं तरी पोलिसांनी या घटनेची प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. ही घटना घडली तेव्हा त्या परिसरात मोठ्या प्रमाणात धुरांचे लोट आणि आगीच्या ज्वाळा पसरल्या होत्या. या घटनेचा व्हिडीओ देखील आता समोर आला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

# डिजिटल मिडीया परिषदेच्या राज्यव्यापी मेळावा १४ सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे संपन्न होणार

## मिलींद अष्टीवकर, अनिल वाघमारे या अध्यक्षद्वयांची घोषणा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------

डिजिटल मिडियात कार्यरत असलेल्या पत्रकारांचा पहिला राज्यव्यापी मेळावा रविवार दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजीनगर येथे होत असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी दिली. मेळाव्याचे उद्घाटन राज्यातील पत्रकारांचे नेते एस.एम.देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.. अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचा एक उपक्रम असलेल्या डिजिटल



मिडिया परिषदेचा विस्तार राज्यभर झपाट्याने होत आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या आहेत.. सर्वांना एका धाग्यात बांधण्यासाठी एक राज्यव्यापी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.. या मेळाव्यात राज्य कार्यकारिणीची घोषणा होणार असून उत्कृष्ट युट्यूब चॅनल आणि पोर्टल चालविणाऱ्या दहा संपादकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.. दोन सत्रात होणाऱ्या या मेळाव्यात व्यावसायिक पद्धतीने चॅनल कसे चालवावे, त्यातून महसूल कसा उभा करावा, या संबंधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.. मेळाव्याचे स्थळ आणि अन्य माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातील युट्यूब, पोर्टलच्या संपादकांनी मेळाव्यास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहनही मिलिंद अष्टीवकर आणि अनिल वाघमारे यांनी केले आहे...

# विश्व मानव रुहानी केंद्र पिंपळनेर या ठिकाणी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराजदूत

------------------

सालाबादप्रमाणे याही वर्षी विश्व मानव रुहानी केंद्र पिंपळनेर या ठिकाणी गुरुपौर्णिमा कार्यक्रम साजरा करण्यात आली. भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. यावेळी सत्संग भजन गायन हा



कार्यक्रम संपन्न झाला. विश्व मानव रुहानी केंद्र एक आध्यात्मिक केंद्र असून लोक कल्याणासाठी आपले कार्य करत असते.

प्रमुख परम संत बलजीत सिंग जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आपले कार्य करत असते महाराष्ट्रात नव्हे तर पूर्ण भारतात विश्व मानव रुहानी केंद्र आहेत . यावेळी पिंपळनेर मानव केंद्रात मोफत वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित केले होते . हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक आले होते . पिंपळनेर मानव केंद्राच्या परिसरात विविध दुकाने दिसून आले.

# सदगुरुंच्या दर्शनासाठी येवती (लघु आळंदी) येथे भाविकांची गर्दी

## शेकडो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वाराज्य्दूत

--------------------------

गुरुपौर्णिमेच्या निमित्त गुरुवारी (दि. १०) येवती (लघु आळंदी)ता. मुखेड) येथे श्री प.पू.सद्गुरु नराश्याम महाराज यांच्या दर्शनासाठी व गुरुमंत्र घेण्यासाठी भाविकांचा सागर लोटला होता. यावेळी महाप्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला.



दरवर्षी गुरु पौर्णिमेच्या दिवशी लघु आळंदी म्हणून ख्यातकिर्त असलेल्या येवती येथे श्री प.पू.सद्गुरु नराश्याम महाराज यांचे दर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी मराठवाडा व कर्नाटकाच्या सीमावर्ती भागातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. यावेळी इच्छुक भाविकांना गुरुमंत्र देऊन दीक्षा दिली जाते. त्यासाठी भाविक लांबवरुन प्रवास करुन येत असतात. मठ परिसरात अलीकडे चांगल्या पैकी भौतिक सुविधा झाल्याने भाविकांची सोय झाली आहे. यावर्षी सुद्धा गुरुवारी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यानिमित्त पांडुरंग गोविंदराव यन्नावार पाळेकर, रा. देगलूर व भास्कर पाटील शिरूरकर यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. श्री.प.पू सद्गुरु नराश्याम महाराज यांनी सर्वांना दर्शन देत आशीर्वाद दिला व इच्छुक भविकांना गुरुमंत्र दिला. असंख्य तरुण भाविकांनी व्यवस्था अबाधित ठेवत भाविकांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घेतली. गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# लामकानी मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबिर संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

जिल्हाधिकारी धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली रामआणि तहसीलदार कार्यालय धुळे ग्रामीण तसेच मंडळ कार्यालय लामकानी यांच्या संयुक्त विद्यमाने “छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर” अत्यंत यशस्वीरित्या संपन्न झाले.






याप्रसंगी उपस्थित तहसीदार धुळे ग्रामीण अरूण शेवाळे, नायब तहसीलदार देवेंद्र येवले र, मंडळ अधिकारी लामकानी दिलीप चौधरी, ग्राम महसूल अधिकारी. राहुल सोनवणे, अंकुश भैरट, विशाल कदम, भूषण चौधरी, कृष्णा पवार, भाग्यश्री बोरसे व महसूल सेवक नरेश माळी, राधिका वाडिले, उषा कर्वे, धनश्री बागुल, तसेच मंडळातील गावाचे सरपंच, उपसरपंच उपस्थित होते.

या शिबिरात २६६ दाखले वाटप करण्यात आले, त्यात
दुय्यम शिधापत्रिका -१८
उत्पन्न दाखले -११०
अधिवास प्रमाणपत्रे -१७
जिवंत ७/१२ टप्पा १/२-७६
विशेष सहायय योजना - २०
फार्मर id - २५ असे २६६ दाखले यावेळी वाटप करण्यात आले. या शिबिरास महसूल मंडळ कार्यालय लामकानी आणि परिसरातील गावांतील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग लाभला.

# शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू - अनिल भोकरे सेवा निवृत्त जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

## महाराष्ट्र राज्याच्या इतिहासातील अभुतपुर्व कार्यक्रम : धुळे जिल्ह्यातील सेंद्रिय शेतकऱ्यांनी केला कृषि विभागातील शासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान व सत्कार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------

"आज आम्हाला जो सन्मान दिला गेला आहे तो आम्हाला नवी उमेद आणि जबाबदारी देऊन जात आहे सेवा संपली असली तरी शेतीपासून आमचं नातं कधीच संपणार नाही म्हणून यापुढेही आम्ही शेतकऱ्यांच्या उत्पादनासाठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू " अशी ग्वाही सेवानिवृत्त जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री अनिलजी भोकरे यांनी आज चांडक सेंद्रिय फार्म येथे धुळे जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या वतीने आयोजित अभूतपूर्व सन्मान व सत्कार सोहळ्याला उत्तर देताना दिली. सन्मान व सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सेंद्रिय शेतकरी सुधाकर दादा बेंद्रे होते . यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रकल्प संचालक आत्मा धुळे श्री हितेंद्र सोनवणे ,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम श्री आरिफ शहा , कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र धुळे श्री दिनेश नांद्रे , प्रा.पंकज पाटील, कृषी विकास अधिकारी श्री सिताराम चौधरी , कृषी भूषण सेंद्रिय शेती श्री इलियास भाई कुरेशी , शाश्वत सेंद्रिय शेतकरी अशोक भाई शहा , आनंदराव पाटील , श्री भास्कर गव्हाणे सेंद्रिय विस्तार अधिकारी समृद्धी ऑरगॅनिक पुणे , नितीन वारके सर्ग विकास समिती धुळे , जय भूमी ॲग्रो चे अविनाश पाटील, सेंद्रिय कृषी भूषण श्री दिलीप पाटील , आदी व्यासपीठावर उपस्थित होते







महाराष्ट्राच्या इतिहासात या अभूतपूर्व सत्कार व सन्मान सोहळ्याचे आयोजन धुळे जिल्ह्यातील प्रगतशील सेंद्रिय शेतकऱ्या व त्यांच्या संलग्न संस्थांनी आयोजित केला होता कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेंद्रिय कृषी भूषण व गो संजीवन संस्थेचे संस्थापक श्री दिलीप पाटील यांनी केले प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी वाशिम श्री आरिफ शाह म्हणाले की माजी कृषी सचिव व आयुक्त श्री सुधीर कुमार गोयल व विभागीय कृषी सह संचालक श्री आर. एच. पाटील साहेब यांनी धुळ्यावर जे प्रेम केलं , विश्वास दिला त्यामुळे सेंद्रिय शेतीची चळवळ यशस्वी झाली . आज तोच वारसा मी वाशिम जिल्ह्यामध्ये यशस्वीपणे पुढे चालवतो आहे .जलतारा प्रकल्प व चिया सीड्स लागवड यामुळे वाशिम जिल्ह्याचे नाव जगभर झाले, आणि हे सर्व शक्य झाले ते आजच्या सत्कारार्थींच्या प्रेरणेमुळे.

सेंद्रिय शेतीच्या धुळे पॅटर्नला आकार देणारे सेवानिवृत्त कृषी अधिकारी श्री पी एम सोनवणे श्री अनिल भोकरे श्री विनय बोरसे श्री अमृत पवार श्री महेंद्र वारुळे श्री कैलास देवरे श्री सतीश पाटील आदि मान्यवरांचा कार्याचा गौरव करून सन्मान व सत्कार सेंद्रिय शेतकऱ्यांकडून करण्यात आला . कार्यक्रमाचे अध्यक्ष सुधाकर दादा बेंद्रे, कृषि विकास अधिकारी सिताराम चौधरी, कृषी विज्ञान केंद्राचे प्रा.दिनेश नांद्रे, सेवा निवृत्त कृषिविकास अधिकारी पी.एम. सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी पर्यवेक्षक श्री प्रवीण पवार व वाल्मिक सोनावणे यांनी केले. हा अभूत पूर्व सोहळा यशस्वी करण्यासाठी चांडक सेंद्रिय फार्मचे संचालक विजय चांडक, उद्यान पंडित विलास माळी, कृषी भूषण दिलीप पाटील , जय भूमीचे अविनाश पाटील , मधुकर पाटील , डॉ धनंजय नेवाडकर, वाल्मीक पाटील, संजू महाराज, शशिकांत भदाणे, सुनील पाटील, वसंतराव साळुंखे, प्रकाश पाटील , गोपीचंद पाटील, सुदाम करंके, समृद्धी ऑरगॅनिक ची प्रशांत मोराणकर, सर्ग विकास समितीचे राजेश तिवारी, सुजित काटे, प्रवीण सोनवणे, सतीश शिंदे, कृषी पदवीधर संघाचे सागर चिमटे, कोमल माळी, पंकज महाजन आदींनी परिश्रम घेतले.

# जागितक युनेस्को संघटनेने बागलाण तालुक्यातील साल्हेर किल्ल्याला दिला जागितक स्थळाचा दर्जा

## आदिवासी बांधव या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------------



नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यातील साल्हेर किल्ला आता जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखले जाणार आहे. बागलाण वासियांना तसेच किल्ले प्रेमी यांना आनंदाची बातमी असून जागतिक युनेस्को संघटनेने शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पद्पर्शाने पावन झालेल्या साल्हेर किल्ल्याला जागतिक स्थळाचा दर्जा मिळाला आहे म्हणून या ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार होण्यासाठी बागलाण तालुक्याच्या आमदार दिलीप मंगळू बोरसे व तमाम हिंदुत्ववादी संघटना, मराठा बांधव व आदिवासी बांधव या ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार होण्यासाठी आज १२ जुलै ठीक १० वाजता या ऐतिहासिक साल्हेर किल्ल्याला पायत्याची नमस्तक झाले

युनोस्कोने जागतीक वारसा स्थळ म्हणून महाराष्ट्रातील १२ किल्ले - किल्ले साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जींजी यांना जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता मिळाली. निश्चितच आपल्या संपूर्ण भारतियांसाठी अभिमानास्पद बाब आहे. यावेळी आदिवासी बांधव, शिवप्रेमी, पर्यटक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बागलाणचे आमदार-दिलीप बोरसे बोलताना म्हटले की आज शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या साल्हेर किल्ल्याच्या पायथ्याला जाऊन तेथील पवित्र माती मस्तकाला लावून नतमस्तक झालो. शिवरायांच्या एकूण बारा किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणुन घोषित केले यामध्ये साल्हेर किल्ल्याचा देखील समावेश आहे ही निश्चित मोठी अभिमानाची बाब आहे आपल्या सर्वांसाठी. या युनेस्को संघटनेने जागतिक वारसा स्थळ म्हणून साल्हेर आदिवासी भु भागाला न्याय दिला असून आभार मानले.



या जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता मिळाल्याने आदिवासी बांधव व नागरिकाना व्यवसायास देखील संधी उपलब्ध होईल. जगाने देखील या साल्हेर स्थानाचे महात्म्य ओळखले. आता या गौरवशाली इतिहासाची जोपासना करण्याची आपली जबाबदारी वाढली आहे-
**विजय बहिरम**

# माजी विद्यार्थी हे शाळेचे assets आहेत : अमोल पाटील

## २००६ दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा उत्साही वातारणात संपन्न

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------------

अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात २००६ असलेल्या दहावीतील विद्यार्थ्यांनी (गेट-टु गेदर) स्नेह मेळावा आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अमोल पाटील उपस्थित होते.

या स्नेह मेळाव्यातून विद्यार्थ्यांनी गुरुजनाविषयी शाळेशी व संस्थेशी ऋणानुबंध जपले असून संस्थेच्या नावलौकिकात भर पडेल अशी उत्तम कामगिरी शिक्षण घेऊन केली आहे. संस्था सर्वतोपरी विद्यार्थ्यांच्या हितासाठी व सर्व स्तरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असून त्यांच्या शिक्षणाच्या पाल्याच्या हितासाठी अनेक शैक्षणिक नवीन धोरणे राबवित आहे. संस्था अध्यक्ष बाळासाहेब पाटील राबवत असलेल्या संस्थेविषयी कार्याची माहिती स्पष्ट करीत यापुढेही असे स्नेह मेळाव्यातून विद्यार्थ्यांशी संवाद घडवून आणण्यासाठी शाळा सुद्धा आशावादी असल्याचे अमोल पाटील यांनी मनोगतातून स्पष्ट केले. मेळाव्याचे कौतुक केले. शिक्षक श्री सुनील पाटील, माजी मुख्याध्यापक किशोर चौधरी, माजी मुख्याध्यापक श्री राजेन्द्र देसले , मुख्याध्यापिका कविता देवकर , एल. पी देसले , बी जे पाटील , विलास सूर्यवंशी यांनीही आपल्या मनोगतातून तत्कालीन विद्यार्थ्यांशी असलेला स्नेह आजही तशाच प्रकारे वृद्धिंगत होत असून काही मजेशीर बाबीही सांगितल्या. माजी विद्यार्थी भूषण







उंडे, योगेश देसले, गणेश खैरनार, सुदाम शेवाळे , नीलम भावसार, सरिता रुळे, प्रियांका पट्टेबहादुर, मनिषा दोडके, दीपिका निकम , हर्षाली वाघ , निकिता गांगुर्डे, सोनम मुळे, नागेश कोरडे, हरीश, आंबेकर ,जाधव , यांनीही शाळेविषयी असलेली कृतज्ञता मनोगतातून व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी सहकारीसाठी संगीत खुर्ची व इतर मनोरंजनाचे खेळ आयोजित केले होते. त्यांनी गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच शाळेस भेटवस्तू ही दिल्यात. सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद घेत तत्कालीन शालेय बाबींना उजाळा देत काही वेळ वर्गात बसून आनंद उपभोगला. ज्येष्ठ शिक्षक कुमुद मोरे , सुरेंद्र कदमबांडे,प्रतिभा घोरपडे ,मनीषा पाटील ,वरिष्ठ लिपिक सुनील पाटील भाऊसाहेब भामरे यांचाही विद्यार्थ्यांनी गौरव केला. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्हे देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलम भावसार हिने केले.

# नाशिकमधील विद्यार्थी समूहाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक मराठी ई-पुस्तकाचे मोफत प्रकाशन

## "कृत्रिम बुद्धिमत्ता: एक संधी" या पुस्तकाद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

नाशिकमधील 'जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह' यांच्या अभिनव पुढाकारातून आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि मशीन लर्निंग या अत्याधुनिक विषयांवर आधारित "कृत्रिम बुद्धिमत्ता: एक संधी" हे मराठीतील सर्वसमावेशक ई-पुस्तक मोफत प्रकाशित करण्यात येत आहे. समूहप्रमुख तथा विद्यार्थी प्रतिनिधी प्रसाद भालेकर यांच्या वाढदिवसानिमित्त (दि. १६ जुलै) हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत असून, दि. १६ जुलै २०२५ पासून विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य उपलब्ध होणार आहे.

**आधुनिक तंत्रज्ञानाची मराठी भाषेत ओळख**

हे पुस्तक इयत्ता पाचवी ते बारावी या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी विशेषतः तयार करण्यात आले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगसारख्या आधुनिक संकल्पनांची मराठी भाषेत सोप्या पद्धतीने ओळख करून दिली आहे. या पुस्तकाची विशेष वैशिष्ट्ये म्हणजे त्यात ३० अध्यायांचा समावेश आहे ज्यात संकल्पनांची सखोल माहिती आणि उदाहरणांसह सादरीकरण केले आहे.

समूहप्रमुख प्रसाद भालेकर यांच्या नेतृत्वाखाली तयार केलेल्या या पुस्तकात सोप्या व समजण्याजोग्या मराठीत लेखन केले असून, विद्यार्थ्यांना सहज आकलन होऊ शकेल अशी भाषा वापरली आहे. डिजिटल युगासाठी तयार करणारे मार्गदर्शन देणाऱ्या या पुस्तकाचा उपयोग शिक्षक, पालक, मार्गदर्शक यांच्यासाठीही उपयुक्त ठरेल.




**व्यापक उपलब्धता आणि प्रवेश**

दि. १६ जुलै २०२५ पासून "कृत्रिम बुद्धिमत्ता: एक संधी" हे डिजिटल पुस्तक जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूह, नाशिकच्या अधिकृत माध्यमांवर मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी QR कोड स्कॅन करून जीवन केशरी मराठी विद्यार्थी समूहाच्या अधिकृत व्हॉट्सअप ग्रुपमध्ये सामील व्हावे, जेणेकरून त्यांना पुस्तकाची अधिकृत प्रत मिळू शकेल.

दि. १६ जुलै २०२५ ते ३० जुलै २०२५ या कालावधीत राज्यभरातील पाचवी ते बारावीतील विद्यार्थ्यांना हे ई-पुस्तक विनामूल्य प्राप्त करता येईल. सद्यस्थितीत काही तांत्रिक अडचणीमुळे पुस्तकाचे छापील स्वरूप (Paperback) सादर करता आलेले नसले, तरीही डिजिटल स्वरूपात हे पुस्तक व्यापक प्रमाणावर पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**मराठी भाषेतील तांत्रिक ज्ञानप्रसारासाठी महत्त्वाचा टप्पा**

या पुस्तकाची संकल्पना, लेखन, माहिती संकलन व मांडणी ही समूहप्रमुख प्रसाद भालेकर यांची असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे. विद्यार्थी प्रतिनिधी अदित्य रिकामे , अमित पगार आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी भार्गवी पाटील , प्रगती भडांगे व रोहिणी गांगुर्डे यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. संपूर्ण समूहाच्या कार्यसमितीचे या उपक्रमात अमूल्य योगदान आहे.

विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या अत्यंत उपयुक्त विषयाची ओळख करून घ्यावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मराठी भाषेतील तांत्रिक ज्ञानप्रसारासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

**संपर्क माहिती**

कु. प्रसाद भालेकर
मो. ९५२९१९५६८८ (दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत)
Email : jivankeshrimarathi@gmail.com

पुस्तक प्राप्त करण्यासाठी QR कोड स्कॅन करा आणि अधिकृत WhatsApp समूहात सामील व्हा.

या नावीन्यपूर्ण उपक्रमाला विद्यार्थ्यांनी व शिक्षणप्रेमींनी भरभरून प्रतिसाद द्यावा, ही विनंती.

सोबत व्हाट्सअप ग्रुपला जॉईन होण्यासाठी QR Code व ईबुक चे मुखपृष्ठ जोडले आहे

# नूतन प्राथमिक विद्यामंदिर रमाबाई आंबेडकर नगर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

नूतन प्राथमिक विद्यामंदिर, रमाबाई आंबेडकर नगर येथे दिनांक १२ जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा कार्यक्रम उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला.या कार्यक्र मात विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. "गुरू म्हणजे काय? " तसेच "गुरूंचे जीवनातील महत्त्व" यासारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत आपल्या भावना शब्दांत व्यक्त केल्या. यामुळे संपूर्ण




शाळा परिसरात भक्तीमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्री. एकनाथ जाधव सर, सर्व शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. श्रावणी वाव्हुळे (इयत्ता ७ वी) हिने प्रभावीपणे केले.

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**